# प्रेस नोट

ला.प्र.वि,वाशिम.

दि.१०/०८/२०२३

आरोपी लोकसेवक क्र. लोकसेवक अनंत किसन राठोड वय ३४ वर्ष, व्यवसाय नोकरी, महसुन सहायक प्रस्तुतकार -२ तथा अतिरीक्त कार्यभार प्रस्तुतकार-१ तहसिल कार्यालय मानोरा ता.मानोरा जि.वाशिम रा. जोगलदरी ता. मंगरुळपीर जि.वाशिम याने तक्रारदार श्री.विष्णु चंदुसिंग राठोड,वय ५९ वर्षे,सेवानिवृत्त-कॅशिअर बेस्ट बृंहमुंबई महानगर पालीका रा.रिध्दी सिध्दी अपार्टमेंट, बी विंग रुम नं.१५, विशाल कॉम्प्लेक्स चक्की नाका कल्याण पुर्व,जि.ठाणे ह.मु. साखरडोह ता.मानोरा जि.वाशिम यांचे विरुध्द यशस्वी सापळा कारवाई करुन पोस्टे मानोरा अप.नं.५१८/२०२३ कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हया दाखल करुन त्यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | अनंत किसन राठोड वय ३४ वर्ष, व्यवसाय नोकरी, महसुन सहायक प्रस्तुतकार -२ तथा अतिरीक्त कार्यभार प्रस्तुतकार-१ तहसिल कार्यालय मानोरा ता.मानोरा जि.वाशिम रा. जोगलदरी ता.मंगरुळपीर जि.वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | १,५०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे नावने असलेल्या शेतीचे अकृषक करुन दाखला देण्याकरीता १,५०,००० रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | श्री सुजित कांबळे पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.१०/०८/२०२३ रोजी तक्रारदार पुरुष वय ५९ वर्ष यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे मुळ गांव साखरडोह ता.मानोरा जि.वाशिम असुन मौजे साखरडोह येथील स.नं.५७ गट नं ४८ मधील ६.३० हे.आर शेती तक्रारदार यांचा पुतण्या श्री.अमोल तारासिंग राठोड रा.साखरडोह ता.मानोरा यांनी सदर शेतीचा ७/१२ हा त्याचे नावावर करण्याकरीता व शेतीजमीन मालकिचे सेल सर्टीफिकेट मिळणेकरीता तक्रारदार यांनी पुतण्या अमोल राठोड चे नावाने आवश्यक ती कागदपत्रांसह मा.तहसिल कार्यालय मानोरा येथे रितसर अर्ज दिनांक २१.०६.२०२३ रोजी केला होता. दिलेल्या अर्जाच्या प्रकरणात तहसिल कार्यालय मानोरा येथे २ तारखा झाल्या. सदर प्रकरण आदेशाकरीता प्रलंबित आहे. त्यामुळे आदेश करण्यासंबधाने ते दि.३१.०७.२०२३ रोजी तहसिल कार्यालय मानोरा येथील श्री.अनंता राठोड लिपीक यांना कार्यालयात जावुन भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना साखरडोह येथील स.नं.५७ गट नं ४८ मधील ६.३० हे.आर शेतीचे मालकिचे सेल सर्टीफिकेट पुतण्या अमोल राठोड यांचे नावे देण्याकरीता १,५०,०००/-रुपयाची मागणी केली आहे. अशा तक्रारीवरुन दिनांक ०१/०८/२०२३ रोजी केलेल्या पडताळणी दरम्याने आलोसे यांनी १,५०,००० रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. दिनांक ०३/०८/२०२३ रोजी सापळा कारवाई करण्यात आली परंतु आलोसे यांनी रक्कम स्विकारली नसल्याने परत दिनांक ०९/०८/२०२३ रोजी यशस्वी सापळा कारवाई वेळी आलोसे अनंत किसन राठोड यांनी १,५०,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने आलोसे कडुन लाच रक्कम रुपये १,५०,०००/- हस्तगत करुन आरोपी लोकसेवक अनंत किसन राठोड यांचे विरुद्ध सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक,श्री मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री देविदास घेवारे, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती, यांचे मार्गदर्शनात व पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री गजानन आर शेळके,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे सह तपास अधिकारी पोलीस निरीक्षक श्री सुजित कांबळे लाप्रवि वाशिम यांचे पथकातील कर्मचारी पोहवा विनोद मारकंडे, नितीन टवलारकर, विनोद अवघडे, राहुल व्यवहारे, दुर्गादास जाधव, पोना योगेश खोटे, रवि घरत व चापोशि शेख नावेद यांनी केली.

शासकिय लोकसेवकान,खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनी कमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल कमांक - ९९२२२४३४३८ यावर संपर्क साधण्याचे आवाहन श्री सुजित कांबळे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,वाशिम यांनी केले आहे.

(सुजित कांबळे)

पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.,वाशिम.